दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक १६६ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.९ सप्टेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## परमबीर सिगांनी सायबर तज्ञाला दिले होते ५ लाख
## अँटिलीया स्फोटक प्रकरणात केली फेरफार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राष्ट्रीय तपास यंत्रणेकडून दाखल केलेल्या एका आरोपपत्रात एजन्सीमधील एका सायबर तज्ज्ञाने धक्कादायक माहिती दिली आहे. माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांनी अँटिलीया स्फोटक प्रकरणाची फेरफार करण्यासाठी जैश-उल-हिंद नावाच्या दहशतवादी संघटनेशी संबंधिक अहवालात छेडछाड केली असल्याचा दावा सायबर तज्ज्ञांनी केला आहे. यासाठी परमबीर सिंग यांनी सायबर तज्ज्ञाला ५ लाखांची लाच दिली असल्याचंही त्यानं सांगितलं आहे.

NIAने सायबर तज्ञाचा ५ ऑगस्टला जबाब नोंदवला होता. तेव्हा त्येनं तो अनेक आयपीएसला सायबरशी संबंधित ट्रेनिंग देतो असे सांगितले. सोबतच काही इंटेलिजेंस एजन्सी सोबतही काम करतो अशी माहिती दिली. ९ मार्च २०२१ रोजी .../२

# सिडको आणि नैनाला हद्दपार करण्यासाठी प्रकल्पग्रस्त बांधवांनी एकत्र यावे : ॲड.सुरेश ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**सिडको आणि नैना रुपी राक्षस शेतकरी आणि प्रकल्पबाधितांवर अन्याय करत असून सिडको आणि नैनाला कायमचे हद्दपार करण्यासाठी सर्व शेतकरी प्रकल्पग्रस्त बांधवांनी एकत्र येऊन अस्तित्वाच्या लढाईत सहभागी होण्याचे आवाहन नवी मुंबई ९५ गाव, नैना व इतर प्रकल्पग्रस्त समितीचे अध्यक्ष ॲड. सुरेश ठाकूर यांनी केले. ते नवीन पनवेल येथील भगतवाडीतील साई मंदिरात बोलत होते. लवकरच गणरायाचे आगमन होत असून त्यानंतर नवरात्र, दसरा दीपावली असे सण येत आहेत. या निमित्ताने शेतकरी बांधवांशी संपर्क साधण्यासाठी आरती संग्रहाच्या निमित्ताने एक अनोखी युक्ती लढवली आहे.**



शेतकरी भूमीपुत्रांना सिडको, नैना विरोधात लढण्यासाठी आरती पुस्तिकेच्या माध्यमातून संपर्क साधून सर्व शेतकऱ्यांना संघटित करून, त्यांच्यामध्ये जनजागृती करून एक मोठा निर्णायक लढा आ-पणास उभारावा लागेल व विनाशकारी प्रकल्पापासून शेती व शेतकऱ्यांना वा-चवावे लागेल असे प्रतिपादन ॲड.सुरेश ठाकूर यांनी आयोजित केलेल्या आरती पुस्तिका प्रकाशनाच्या कार्यक्रमादरम्यान केले.

यावेळी प्राध्यापक रानडे, नामदेवशेठ फडके, माजी सरपंच दत्ताशेठ भगत, माजी उपसभापती राजेश केणी, उरण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुभाषशेठ भोपी, वामन शेळके, पत्रकार सुनील कटेकर, शेखर शेळके, विलास फडके, सुरेश पवार, बाळाराम फडके यांच्यासह आदी संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाला खऱ्या अर्थाने समाजकारणाचा मूळ हेतूडोळ्यासमोर ठेऊन या आरती संग्रहाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मौलिक संदेश देण्यासाठी सिडको व नैनाचे दुष्परिणाम शेतकऱ्यांना पटवून दिले आहेत. शेती व शेतकऱ्यांना टिकवून ठेवण्यासाठी समाजाने संघटित होणे गरजेचे आहे. नैनामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होणार आहे तसेच या प्रकल्पामुळे २७० गावांतील झाडे तोडली जाणार असून भविष्यात सिमेंटची जंगले उभी राहिल्यास निसर्गचक्र बिघडून नैसर्गिक आपत्ती येण्याचा संभाव्य धोका ॲड. सुरेश ठाकूर यांनी व्यक्त केला. त्यामुळे शेतकऱ्यांना मौल्यवान संदेश देण्यासाठी लोकसहभागातून आरती पुस्तिका छापण्यात आली आहे. या पुस्तिकेतून विकासाच्या गोंडस नाव-ाखाली शेतकऱ्यांना उध्वस्त करणाऱ्या नैना प्रकल्पाबाबत माहिती, प्रकल्पामुळे बदलणारा जमिनीचा मालकी हक्क, नैना प्रकल्प नको असेल तर पर्याय काय, विरार- अलिबाग महामार्ग, पनवेल-कर्जत रेल्वे मार्ग, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ आदी विषयांवर सविस्तर माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली आहे. या माध्यमातून असंख्य भूमिपुत्र व संघटनांनी आंदोलन बळकट करण्यासाठी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# राज्य सरकार शिक्षकांचा अनादर करतोय

## शिक्षकांचा राज्य सरकारवर आरोप



**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिक्षकांना गुरु मानतात पण राज्य सरकार शिक्षकांच्या मागण्यांकडे हेतुपुरस्कर दुर्लक्ष करून गुरूंचा अनादर करत असल्याची घणाघाती टीका आज (दि. ०८) पनवेलमध्ये झालेल्या जनआंदोलनात करण्यात आली. ज्ञानदानासाठी आयुष्य खर्च केले त्या शिक्षकांना त्यांच्या न्यायिक हक्कापासून वंचित ठेवणाऱ्या महाविकास आघाडी ठाकरे सरकारचा यावेळी शिक्षकांनी निषेध व्यक्त केला.

शिक्षकांच्या मागण्यांसाठी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप उत्तर रायगड शिक्षक सेलच्या वतीने आंदोलन करण्यात आले. कोरोना प्रादुर्भाव संदर्भातील नियमांचे पालन करून झालेल्या या आंदोलनात भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, शिक्षक सेलचे जिल्हा संयोजक के.सी. पाटील, सहसंयोजक भूषण जोशी, नगरसेविका दर्शना भोईर, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, कामगार नेते जितेंद्र घरत, अनेश ढवळे, शिक्षक सेलचे पनवेल शहर मंडल संयोजक अनंता कोळी, प्रमोद तालुका मंडल संयोजक कोळी, कामोठे संयोजक लक्ष्मण जगताप, लक्ष्मण पाटील, बाबासाहेब ठोंबरे यांच्यासह निवृत्त शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

जुनी पेन्शन योजना लागू करावी, शिक्षकांचे पगार व पेन्शन वेळेवर द्यावे, वरिष्ठ वेतन श्रेणी व निवड श्रेणीचा लाभ मिळावा, मेडिकल बिल मिळावे, केंद्र सरकारप्रमाणे डि. ए. तात्काल देण्यात यावा, शिक्षकांच्या रिक्त जागा लवकरात लवकर भरण्यात याव्यात, पी. एफ. च्या पावत्या वेळेवर मिळत नाहीत ते वेळेवर द्यावे, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे लसीकरणाला प्राधान्य द्यावे, शाळा लवकरात लवकर सुरू कराव्यात, प्रलंबित वैद्यकीय, चटोपाध्याय, पुरवणी व इतर सर्व प्रकारची देयके तात्काल निकाली काढावी तसेच अनुकंपा तत्वावरील नियुक्त्या दिरंगाई न करता तात्काळ करण्यात याव्यात, अशा मागण्या घेऊन हे आंदोलन करण्यात आले. शिक्षकांच्या सन्मानार्थ भाजप मैदानात, जुनी पेन्शन योजना लागू झालीच पाहिजे, मुल्यांकन प्राप्त शाळांना अनुदान लागू झालेच पाहिजे, पात्र शिक्षकांना वरिष्ठ व निवड श्रेणीचा लाभ मिळालाच पाहिजे, अशा शिक्षकांनी जोरदार घोषणा देऊन आपल्या मागण्यांवर जोर दिला.

# उरण-पनवेल रस्त्यावरील धोकादायक पुलाची दुरुस्ती होणार

## सिडकोच्या अधिकाऱ्यांचे किसान सभेच्या पदाधिकाऱ्यांना आश्वासन



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण - पनवेल महामार्गावरी फुंडे बसस्टॉप जवळील पूल तातडीने दुरुस्त करावा या मागणीसाठी काल बुधवारी किसान सभेच्या वतीने सिडकोच्या द्रोणागिरी नोडच्या कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चाच्या शिष्टमंडळाला सिडकोच्या अधिकाऱ्यांनी पुलाची दुरुस्ती करण्याचे आश्वासन दिले आहे. या संदर्भात पुढील चर्चा करण्यासाठी येत्या सोमवारी उरणच्या तहसिलदारांच्या उपस्थितीत सिडको व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्याची बैठक घेण्यात येणार आहे.

सिडकोच्या भ्रष्टाचारी कारभारामुळे एप्रिल महिन्यात फुंडे गावाजवळील पूल कोसळला होता. या अपघातात दीपक कासुकर नावाच्या तरुणाला आपला जीव गमवावा लागला होता. त्यानंतर सिडकोच्या इतर पुलांचे परीक्षण करण्याची मागणी झाल्यानंतर उरण पनवेल रस्त्यावरील फुंडे .../२



# मराठी पाऊल पडते कुठे?

संयुक्त महाराष्ट्र झाल्यापासून बेळगाव, कारवार आणि सीमाभागातील महाराष्ट्रात येऊ न शकलेल्या कर्नाटकातील मराठी प्रदेशाला महाराष्ट्र आणि मराठी माणूस कधीही विसरलेला नाही. सीमाभागात आजवर उभ्या राहिलेल्या प्रत्येक लढ्यात तो आस्थेने सहभागी झाला. बेळगावच्या मराठी माणसांनीही हा सीमाप्रश्नाचा लढा आजवर जागा ठेवला. या लढ्यासाठी 'महाराष्ट्र एकीकरण समिती' स्थापन झाली, तेव्हा तिने निवडणुकीत उतरावे की आपला लढा प्रत्यक्ष राजकारणात न उतरता चालवावा, यावर मोठे मंथन झाले होते. पुढे समितीने निवडणुका लढवाव्यात, असे ठरले. पालिका, विधानसभा यांच्या निवडणुकांमध्ये समितीने अनेकवार चांगले यश मिळवले. मात्र, बेळगाव महापालिकेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत 'महाराष्ट्र एकीकरण समिती'चा धुव्वा उडाला असून ही महापालिका भाजपच्या ताब्यात आली आहे. दुसऱ्या क्रमांकाच्या जागा काँग्रेसला मिळाल्या आहेत. समितीला केवळ चार जागा मिळाल्या आहेत. मावळत्या सभागृहात समितीचे ३२ नगरसेवक होते. आता निकाल लागल्यानंतर नवी प्रभाग रचना मुद्दाम अशी करण्यात आली, मतदानयंत्रातून मतपावती निघण्याची व्यवस्थाच केली नव्हती, वगैरे तक्रारी केल्या जात आहेत. त्यात तथ्य आहे की नाही, हे पाहणाऱ्या यंत्रणा आहेत. पण यात मूळ मुद्द्याकडे दुर्लक्ष होता कामा नये. तो म्हणजे, बेळगावात मराठी माणसाचा एकसंध बुलंद आवाज आता का टिकलेला नाही? महाराष्ट्र एकीकरण समितीला अंतर्गत दुफळी आणि फुटीचे ग्रहण लागूनही बराच काळ झाला आहे. समितीच्या विविध गटांनी महाराष्ट्रातील नेत्यांना किंवा पक्षांना स्वतंत्रपणे गाठून परस्परांच्या तक्रारी करणे किंवा पाठिंब्यासाठी गळ घालणे, हेही झाले आहे. महाराष्ट्रात राहून बेळगाव-कारवार प्रश्नाचा दिवसरात्र वापर करणाऱ्यांनी कधीही सीमा भागातील समितीकडे गंभीरपणे लक्ष दिलेले नाही. नुसती प्रचारासाठी चार दिवस बेळगावात पायधूळ झाडली म्हणजे कोणी मराठीचे कैवारी ठरत नाहीत. बेळगाव महापालिकेचे सदन ५८ जागांचे आहे. फूट व भांडणांमुळे समितीला तितके उमेदवारही उभे करता आले नाहीत. याला काय म्हणावे? अलीकडेच झालेल्या बेळगाव लोकसभा पोटनिवडणुकीत शुभम शेळके या समितीच्या उमेदवाराने जवळपास सव्वा लाख मते मिळवली होती. मग ते ऐक्य अचानक गेले कुठे? आपल्या बेदिलीमुळे सीमा प्रश्नातली मराठी माणसाची बाजू कमकुवत होते आहे, याचेही भान समितीच्या गटांना आता राहिलेले नाही. त्यामुळेच, त्यांना महापालिकेत केवळ चार जागा मिळाल्या आहेत. याचवेळी, भारतीय जनता पक्षाने ज्या ३५ जागा जिंकल्या; त्यातले २२ नगरसेवक हे मराठी भाषक आहेत. याचा अर्थ, बेळगावातले मराठी भाषक मतदार केवळ एकाच मुद्द्यावर मतदान करायला आता पूर्वीइतके उत्सुक राहिलेले नाहीत. भाजपने या निवडणुकीच्या प्रचारात 'आम्हाला एकदा संधी द्या. शहराच्या विकासाची कामे आम्ही केली नाहीत, तर पुढच्या वेळी पुन्हा महाराष्ट्र एकीकरण समितीला निवडून द्या' अशी भूमिका घेतली होती. याचा अर्थ, एकीकडे सीमा प्रश्न असला तरी बेळगावकरांना चांगले रस्ते, ड्रेनेज, बागा, पाणी इत्यादी उत्तम नागरी सुविधाही हव्या आहेत. मतदानात याही आकांक्षांचे प्रतिबिंब पडले तर ते चूक ठरवता येणार नाही. या निकालामुळे बेळगाव महापालिका, कर्नाटक सरकार आणि केंद्र सरकार या महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाशी संबंध असणाऱ्या तीनही ठिकाणी भाजपची सत्ता झाली आहे. बेळगावातील २२ मराठी भाषक नगरसेवकांनी सीमा प्रश्नासाठी पक्षांतर्गत दबाव निर्माण करावा. गेल्या काही वर्षांमध्ये कर्नाटक सरकार आणि प्रशासन सीमाभागातील मराठी नागरिकांना दुय्यम वागणूक देते आहे. अनेक ठिकाणी त्यांची मुद्दाम अडवणूक केली जाते. हे तातडीने थांबायला हवे. भाषावार प्रांतरचना होण्याआधीही भारतात बहुभाषी नागरिक एका महसूली प्रांतात वास्तव्य करीत होते आणि दरवेळी त्यांचे परस्परसंबंध शत्रुत्वाचे नसत. आज नोकरी, धंदा, व्यवसाय यांच्या निमित्ताने देशभर सर्वभाषिक नागरिक सर्वत्र राहतात. तेव्हा कर्नाटक सरकारने सीमा भागातील मराठी समाजाला शत्रुत्वाने किंवा दुजाभावाने वागवणे आता सोडून द्यायला हवे. ही जबाबदारी बेळगाव महापालिका व राज्य सरकार येथील सत्ताधारी पक्ष या नात्याने भारतीय जनता पक्षाने घ्यायला हवी. बेळगाव, कारवारसहित मराठी भागातील मराठी मुलांना नोकरीतच घ्यायचे नाही, त्यांच्यावर किरकोळ आंदोलने केली तर राजद्रोहाचे गुन्हे दाखल करायचे हे प्रकार कायमचे थांबायला हवेत. एकेक पिढी पुढे जाते आहे, तसतसे प्रश्नांचे आणि लढ्यांचे स्वरूप व तीव्रता बदलत जाणार, हे उघडच आहे. सीमाप्रश्न सुटेल तेव्हा सुटेल; निदान तोवर सर्व सीमा भागातील मराठी माणसाला सुखाने राहता, नोकरी-व्यवसाय करता आला पाहिजे, याची नैतिक जबाबदारी महाराष्ट्र सरकारची आहे. बेळगावात किंवा कर्नाटकात सत्तेवर कुणीही असो; आपल्या या जबाबदारीचे भान महाराष्ट्राने सोडता कामा नये.

# कोकण विभागात २० ऑगस्टपासून राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

प्रशासनातील सेवांच्या गुणवत्तेमध्ये वाढ, लोकाभिमुखता व निर्णयशीलता आणण्याकरिता तसेच सर्वाच्या सहकार्यातून उत्तम प्रशासन कार्यान्वित करण्याकरिता कोकण विभागातील सर्व प्रशासकीय स्तरामध्ये दि.२० ऑगस्टपासून राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा राबविण्याबाबत मनोज रानडे, उपायुक्त (सामान्य), कोकण विभाग, नवी मुंबई यांनी आवाहन केले आहे.

प्रशासन लोकाभिमुख करणे, त्यात निर्णयक्षमता आणणे आणि सर्वांच्या सहकार्यातून उत्तम प्रशासन कार्यान्वीत करणे यासाठी शासन निर्णय दि.२ ऑगस्ट, २००२ नुसार दि.२० ऑगस्ट ते २ ऑक्टोबर या कालावधीत राज्यस्तरावर तसेच तालुका, जिल्हा, विभागीय स्तरावर व महानगरपालिका स्तरावर राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान राबविण्यात येते. सदर अभियान २००१ पासून १६ वर्षे संपूर्ण राज्यात राबविण्यात येत असून या अभियानातंर्गत यशस्वी कार्यालयांना पारितोषिके वितरीत करण्यात येतात. बदलत्या नवीन तंत्रज्ञानामुळे व जागतिकीकरणामुळे प्रशासनामध्येसुध्दा मोठया प्रमाणावर बदल अपेक्षित असल्याने या योजनेचे निकष व कार्यपध्दती नव्याने निश्चित करुन अभियान राबविणे व अभियानांतर्गत स्पर्धा आयोजित करण्यासाठी शासनाने वेळोवेळी शासन निर्णय निर्गमित केले आहेत.

या अभियानाचा कृती कालावधी प्रतिवर्षी दि.२० ऑगस्ट ते २ ऑक्टोंबर असा दीड महिन्याचा असेल. या स्पर्धे करीता दि.२० ऑगस्ट पासून एक वर्षाचा कालावधी विचारात घेतला जाईल. प्रशासकीय सुधारणेविषयी प्रस्ताव व कल्पना यासाठी मात्र कालावधीची अट नसेल. उपविभागाचे मुख्यालय असलेल्या तालुक्याच्या ठिकाणी उप विभागीय अधिकारी आणि इतर तालुक्यात तहसिलदार हे तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक, तलाठी व गट विकास अधिकारी यांना निमंत्रित करतील व तालुका स्तरा-वरील अधिकाऱ्यांच्या सभेमध्ये प्रगती अभियानाची संकल्पना मांडतील. याच सभेमध्ये सहभागासाठी विधानसभा सदस्य, विधान परिषद सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती यांना विशेष विनंती करतील.

जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी, पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक बोलावून जिल्हयातील सर्व संसद सदस्य, विधानसभा/विधान परिषद सदस्य, जिल्हा परिषद अध्यक्ष यांना निमंत्रित करतील. याच बैठकीमध्ये जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद तसेच इतर जिल्हास्तरावरील सर्व विभाग प्रमुख यांनासुध्दा बैठकीस निमंत्रित करतील व सदर योजनेमध्ये सर्वांच्या सहभागाबाबत आवाहन करतील. महानगरपालिकास्तरावर महानगरपालिका आयुक्त, नागरी संस्थांचे सर्व विभाग प्रमुख यांची बैठक घेऊन योजनेमध्ये सर्वांच्या सहभागाबाबत विनंती करतील. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक आयोजित करून संसद सदस्य, विधानसभा/विधान परिषद सदस्य, नगरपालिकेचे व महानगरपालिकेचे पदाधिकारी यांनाही बैठकीस निमंत्रित करतील. या अभियान व स्पर्धेत जास्तीत जास्त शासकीय कार्यालयांनी सहभाग घ्यावा, असे आव-ाहन श्री.मनोज रानडे, उपायुक्त (सामान्य) कोकण विभाग, नवी मुंबई यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे.



**गणेश विसर्जन तयारीच्या अनुषंगाने पनवेल शहरातील प्रमुख विसर्जन घाट वडाळे तलाव येथे महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर यांनी पाहाणी करून गणपती विसर्जनासाठीच्या तयारीचा आढावा घेतला. विसर्जना दरम्यान कोणत्याही अडचणी येऊ नयेत यादृष्टीने नियोजन करण्याची सूचना यावेळी पालिकेच्या अधिकाऱ्यांना केल्या. यावेळी नगरसेवक नितीन पाटील, नगरसेविका दर्शना भोईर, रुचिता लोंढे, मुख्य अभियंता संजय कटेकर आदी उपस्थित होते.**

# म्हसळ्यातील हिंदू -मुस्लिम एकता कायम राखण्याचे दोन्ही समाजाचे आवाहन

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

गौरी -गणपती सणाचे अनुषंगाने म्हसळा पोलीस स्टेशनच्या माध्यमातून आज झालेल्या शांतता सभेत उपस्थित हिंदू - मुस्लीम समाजाचे प्रतिनिधींच्या वतीने आम्ही म्हसळाकर मुळातच शांतता प्रिय आहोत गौरी -गणपतीचे सणात व भविष्यात आम्ही शांतता राखू अशी दोनही समाजाचे वतीने ग्वाही देण्यात आली. म्ह-सळा पोलीस स्टेशनचे स.पो.नी. उद्धव सुर्वे व प्रभारी तहसीलदार के.टी. भिंगारे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या सभेला, म.रा वि.वि. कंपनीचे माने, म्हसळा तालुका हिंदू समाजाचे अध्यक्ष महादेवराव पाटील, शहर अध्यक्ष सुभाष उर्फ बाळ करडे, कांती भाऊ जैन,मुस्लीम समाजाचे नाजीमचोगले, भाजपाचे तालुका अध्यक्ष प्रकाश रायकर, सुरेश शेठ जैन, बाळकृष्ण म्हात्रे, रवी लाड, बाबाजान पठाण, शाहीद उकये, तालुका भाजपा उपाध्यक्ष अनिल टिंगरे, नगर पंचायतीचे सुरेश जाधव,फोरमन चंद्रकांत वारे व अन्य उपस्थित होते.

बहुतांश मान्य वरानी म.रा. वि.वि. कंपनी, सार्वजनिक बांधकाम, नगरपंचायत प्रशासन व राज्य परिवहन विभागाचे जबाबदार प्रतिनिधी उपस्थित नसल्याने नाराजी व्यक्त करून पोलिस प्रशासनाने नागरिकांचे प्रतिनिधीत्व करून गौरी-गणपतीचे सणाचे अनुषंगाने नगरपंचायतीचे माध्यमातून आगमन व विर्सजनाचा मार्ग अडचणमुक्त, स्वच्छ असावा, विर्सजनाचे तीन घाटावर लाईट व्यवस्था व स्वच्छता असावी, लाईफ गार्डची सोय आसावी, म.रा.वि.वि. कंपनीचे माध्यमातून प्रत्येक गाव,वाडीवर स्ट्रीट लाईट लावण्यात यावे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे माध्यमातून बहुतांश मार्गावरील खड्डे तात्काळ भरण्यात यावे अशी मागणी पुढे आली. स्थानिक म्हसळा पोलीस व नियुक्त असलेले वाहतुक पोलीस गाडीचे पासींगचे निकषाने शहरातील गणेश भक्ताना प्रवेश देत नाहीत याबाबत सुधारणा होण्याची मागणी केली.

> म्हसळा पोलीस स्टेशन हद्दीत केवळ एक सार्वजनिक गणेश उत्सव असून, जिल्ह्यांत जमावबंदी असल्याने वाद्य - वाजंत्री- मिरवणुकाना बंदी आहे गणेश भक्तानी कायद्याचे पालन व्हावे याची काळजी घ्यावी
>
> **उध्दव सुर्वे, सहा.पोलीस निरीक्षक, म्हसळा**

# रा.जि.प.वैजनाथ केंद्रात गुंज फाउंडेशनचा सामजिक उपक्रम संपन्न

**दै.रायगड नगरी । माथेरान**

रायगड जिल्हा परिषद केंद्र वैजनाथ मधील रामवाडी, भिवपुरी, पांजिरा, मांडवणे येथील प्राथमिक शाळा आणि ग्रामपातळीवर गुंज या सामजिक संस्थेच्या माध्यमातून शाळेतील विद्यार्थी, गरीब व गरजू ग्रामस्थांना जीवनोपयोगी वस्तूंचे वाटप मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. या कार्यक्रमास वैजनाथ केंद्राचे केंद्रप्रमुख नारायण सोनवणे, भिवपुरी शाळेचे मुख्याध्यापक सागर सांगळे सर आणि गुंज फाउंडेशनचे आनंद खरे, कोकण विभाग पत्रकार संघाचे कर्जत तालुका सचिव महेश साळवी इतर मान्यवर ग्रामस्थ उपस्थित होते.

## PUBLIC NOTICE

Notice is hereby given to inform the public that Smt Sheetal Sharma owner of Flat No 503, Haware Green Park, Phase 3, Sector 22, Kamothe 410209 and bonafide member of Haware Green Park holding share certificate no 097 bearing distinctive nos from 961 to 970. Smt Sheetal Sharma has applied to the society for issue of duplicate share in lieu of original share certificate which is lost.

Any person/ individual/ firms/ institutions having claims or objections for issue of duplicate share certificate are requested to approach the secretary of the society on any day of week between 11.00am to 6.00pm with documentary evidence in support of claim/objection within 15 days from the publication of this notice. Failing which it shall be construed that there are no claims and objections and the society shall issue a duplicate share certificate.

**For Haware Green Park / Secretary / President / Treasurer**
Mob No. 8108322720 / 9820073517 / 7738279379

**पृष्ठ क्र.१ वरुन...**

# अँटिलीया स्फोटक प्रकरणात केली फेरफार

मुंबई पोलीस आयुक्तांच्या कार्यालयात ट्रेनिंग संबंधी चर्चेसाठी गेलो होतो, अशीही धक्कादायक माहिती त्याने दिली.

सायबर तज्ज्ञाने एनआयएला आपला जबाब नोंदवला होता. ज्यामध्ये सायबर तज्ज्ञाने अँटिलिया घटनेनंतर जैश-उल-हिंद या दहशदवादी संघटनेने या घटनेची जबाबदारी स्विकारली, असे त्यांना त्यांच्या अहवालात लिहिण्यास सांगितले असल्याची माहिती दिली. त्यासाठी दिल्लीत इस्त्रायल दूतावासासमोर स्फोट झाल्यानंतर टेलिग्राम चॅनेलचा वापर करण्यात आला. तपास यंत्रणेला सुरुवातीपासूनच अँटिलीया स्फोटक प्रकरणात समोर आलेल्या जैश-उल- हिंदच्या कटात परमबीर सिंग यांचा सहभाग असल्याता संशय आहे. मात्र त्यांनी आपल्या आरोपपत्रात परमबीर सिंग यांची भूमिका काय आहे याबाबत काही स्पष्ट केले नाही. मात्र आता सायबर तज्ज्ञाने परमबीर यांचं नाव घेतलं आहे. त्यामुळे परमबीर यांच्या अडचणीत वाढ झाली आहे.

अंबानी यांच्याकडील सुरक्षा प्रमुखाने NIA ला जबाब दिला. २५ फेब्रुवारीला अंबानी यांच्या घराबाहेर जिलेटिनच्या कांड्या असलेली गाडी आढळली. त्याचा जबाब आरोपपत्रात दाखल केला आहे. NIA ने ३ सप्टेंबर रोजी विशेष न्यायालयात आरोपपत्र दाखल केले आहे.

# उरण-पनवेल रस्त्यावरील धोकादायक पुलाची दुरुस्ती होणार

स्टॉप जवळील पूल कमकुवत असल्याचे स्पष्ट झाले होते. त्यामुळे धोकादायक बनलेल्या पुलावरील एसटी व एनएमएमटी ही सार्वजनिक बस सेवा या मार्गावरून बंद करण्यात आली.

त्यामुळे बोकडविरा, फुंडे,पाणजे, डोंगरी तसेच येथील सिडकोच्या रहिवाशांना उरण किंवा जेएनपीटी कामगार वसाहती पर्यंत बस पकडण्यासाठी रिक्षाला ३० रुपये खर्च करून जावे लागत आहे. तर दुसरीकडे या मार्गावरून मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असतांना सार्वजनिक बांधकाम विभागाने बसेसनाच का बंदी केली आहे. त्यामुळे या परिसरातील नागरिकांची समस्या दूर करून रस्ता सार्वजनिक वाहतुकीसाठी पुरवत सुरू करण्याची मागणी मोर्चाद्वारे करण्यात आली.

यावेळी जेएनपीटीचे कामगार विश्वस्त कॉम्रेड भूषण पाटील, किसान सभेचे रायगड जिल्हा अध्यक्ष रामचंद्र म्हात्रे, संजय ठाकूर,जनवादी महिला संघटनेच्या नेत्या हेमलता पाटील, फुंडे ग्रामपंचायतीचे सरपंच सागर घरत, माजी सरपंच ज्योती म्हात्रे,डी वाय एफ आय चे राकेश म्हात्रे, उरणचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रविंद्र बुधवंत हे ही उपस्थित होते. मोर्चाच्या शिष्टमंडळाशी सिडकोचे कार्यकारी अभियंता एम.एम.मुंडे यांच्याशी चर्चा केली. त्यांनी पुलाच्या उभारणीत सीआरझेड,खारफुटी व पर्यावरणवादी यांचा अडथळा असून पर्यावरण विभागाच्या परवानग्या घेण्यासाठी वेळ लागणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी शिष्टमंडळाने पुलाच्या तातडीच्या दुरुस्तीची मागणी लावून धरली यावेळी सिडकोच्या अधिकाऱ्यांनी कमकुवत पुलाचे पुन्हा एकदा परीक्षण करून त्याची दुरुस्ती कशाप्रकारे करता येईल ते पहिले जाईल, मात्र दुरूस्तीचे काम करण्यासाठी सार्वजनिक विभागाकडून मागणी सिडकोच्या माध्यतून पुलाच्या दुरुस्तीचे काम करणे शक्य असल्याचे मुंडे यांनी यावेळी स्पष्ट केले. त्यामुळे पुलाच्या दुरुस्तीचे काम दृष्टीक्षेपात असल्याचे चित्र आहे. त्याचप्रमाणे यावेळी भूषण पाटील यांनी पूल दुर्घटनेतील मयताच्या वारसांना नुकसानभरपाई देण्याची मागणी वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविण्याची मागणी केली.

ॲड.सुजाता पाटील

## जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.८९१/२०२१
नि.नं.८
ने.ता.८/११/२१

श्रीमती.मंगल उत्तमराव बर्गे व इतर — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

वरील अर्जदार १ यांचे पती व अर्जदार नं.२ व ३ यांचे वडील व मयत कै.श्री.उत्तमराव उर्फ उत्तम वामनराव बर्गे हे दि.२६/०९/२०२० रोजी डी.वाय.पाटील हॉस्पिटल नेरुळ नवी मुंबई येथे मयत झाले. मयत कै. श्री.उत्तमराव उर्फ उत्तम वामनराव बर्गे यांचे नांवे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मालमत्ता परिशिष्ट**
**शॉप नं.११, तळमजला, क्रिस्टल प्लाझा,**
**प्लॉट नं.१८ व २७, सेक्टर ७,**
**खारघर, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड**
**एकूण क्षेत्रफळ : ३४.८५ चौ.मी.बिल्टअप**
**मालमत्ता मुल्यांकन : ११,००,०००/- (अक्षरी अकरा लाख रुपये)**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत मे.न्यायालयात अर्ज केलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत योग्य कागदपत्रासहीत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणचीही हरकत न आल्यास अर्जदाराच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.७/९/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — (कोर्टाचा शिक्का) — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

ॲड.सुजाता पाटील

## जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.४५८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२२/०९/२१

श्री.दत्तात्रय हरिभाऊ कोबल
वय : ३६ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.आ/प कडघे, कान्हेवाडी बुद्रुक ,
तालुका : खेड, जिल्हा : पुणे, महाराष्ट्र ४१०५१३ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

वरील अर्जदार यांची आई/वडिल कै.श्री.हरिभाऊ बाबुराव कोबल हे दि.२०/०५/२०२० रोजी मु.कान्हेवाडी बु.पो.कडघे, ता.खेड, जि.पुणे येथे मयत झालेले आहेत. मयत कै.श्री.हरिभाऊ बाबुराव कोबल यांचे नांवे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मालमत्तेचे वर्णन**
**सेक्टर नं.00३ ई/केएल ५/१६/३/कळंबोली,**
**नोड : कळंबोली, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२१८**
**एकूण क्षेत्रफळ ३३.२१ चौ.फूट**
**मालमत्ता मुल्यांकन : रुपये ६४,०००/- (रुपये चौसष्ट हजार मात्र)**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत मे.न्यायालयात अर्ज केलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत योग्य कागदपत्रासहीत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणचीही हरकत न आल्यास अर्जदाराच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२/९/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — (कोर्टाचा शिक्का) — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

अर्जदाराचे वकील ॲड.सलमान रशिद पटेल

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.यांचे कोर्टात

फौ.चौ.अर्ज नं.९१७/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.११/१०/२१

श्री.इकबाल अब्दुल मजिद डोलारे
वय : ५३ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका,
विभाग-तळोजा पाचनंद — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते आहे की, अर्जदार श्री.इकबाल अब्दुल मजिद डोलारे यांचा दि.१७/०३/१९६८ रोजी मौजे : तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड येथे जन्म झाला आहे. सदरहू अर्जदार यांनी त्यांच्या जन्माच्या तारखेची नोंद होणेकरिता सदरचा अर्ज नामदार कोर्टात दाखल केलेला आहे.

सदरहू श्री.इकबाल अब्दुल मजिद डोलारे यांचा वर नमूद ठिकाणी जन्म झाले आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर किंवा सदर अर्जदारांनी दाखल केलेल्या अर्जाबाबत कोणत्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्यात मे.कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व सदरहू न्यायालय अर्जदार यांचेकडे सदरहू श्री.इकबाल अब्दुल मजिद डोलारे यांच्या जन्माची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.०८/०९/२०२१ रोजी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्या.क.स्तर, पनवेल — (कोर्टाचा शिक्का) — सही/- सहा.अधिक्षक फौ.न्या.क.स्तर, पनवेल

ऑर्डर ५ रुल २०
श्री.भाकरे सो.कोर्ट

ॲड.सुनील एन. मोरे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

स्पे.दि.मु.नं.२१३/२०२०
नि.नं.१०/ड
ने.ता.२६/१०/२१

श्री.संदीप भास्करण कोप्पुल्ली — वादी
विरुद्ध
श्री.संजय बांक्येलाल शाह
वय : ४१, धंदा : व्यापार
रा.सदनिका / ऑफिस क्र.६, प्रजापती आर्केड,
प्लॉट नं.३६, सेक्टर १, नवीन पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड — प्रतिवादी

या जाहीर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, आपणा विरुद्ध या दाव्यात आपण प्रतिवादी म्हणून आहात. ज्यापेक्षा वरील दाव्यात चौकशीसाठी पुढील तारीख २६/१०/२०२१ रोजी नेमली आहे. व तुम्हास या आधी समन्स काढण्यात आले होते आणि वादी या कोर्टात हजर झाला असून तुम्ही त्याप्रमाणे हजर झाला नाहीत. परंतु समन्स परत केल्याबद्दलच्या बेलिफ शेऱ्यावरुन कोर्टाची खात्री होईल अशा रितीने असे शाबीत झाले आहे की, तुम्ही राहत असलेल्या ठिकाणी बरेच दिवस राहत नाहीत, त्यामुळे सदरहू समन्सची बजावणी तुम्हास करता आलेली नाही आणि म्हणून पुरेसा वेळ देवून सुद्धा तुम्ही जाब दिला नाही.

त्यापेक्षा तुम्हास यावरुन नोटीस देण्यात येते की, सदरहू दाव्याची चौकशी तारीख २६/१०/२०२१ या दिवशी नेमली आहे. तुम्ही या दिवशी स्वतः अगर आपल्या वकीलांच्या अथवा अखत्यारी यांचे मार्फत कोर्टात हजर रहावे. हजर न राहिल्यास आपल्या अपरोक्ष दाव्याची चौकशी करून निकाल दिला (ठराव) केला जाईल याची नोंद घ्यावी.

आज तारीख ०८ माहे ०९/२०२१ रोजी आमच्या सही शिक्क्यानिशी व कोर्टाच्या सही शिक्क्यानिशी दिली.

सदरहू जाहीर नोटीसची बजावणी ऑर्डर ५ रुल २० प्रमाणे करण्यात यावी.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — (कोर्टाचा शिक्का) — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत रायगडची बाजी

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

स्टुडंटस् ओलंपिक असोसिएशन अमरावती यांच्या वतीने अमरावती येथे झालेल्या ७ वी राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत रायगडच्या संघाने सुयश संपादित करून रायगड जिल्ह्याचे नाव रोशन केले आहे.

आ.बच्चूभाऊ कडू यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. तर या स्पर्धेतील रायगड जिल्ह्यातील विविध भागातील समाविष्ट करण्यात आलेल्या श्री.शिव प्रतिष्ठान पनवेल-रायगड या संघाच्या वतीने खेळविण्यात आलेल्या १७ व १९ वयोगट मुलांच्या संघांनी अंतिम फेरीत दमदार कामगिरी करून अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्र.संपादित केला आहे.

या स्पर्धेत सेमी फायनलमध्ये १७ वर्षे वयोगट मुले कबड्डी स्पर्धेत अमरावती संघाने रायगड संघाचा पराभव केल्याने रायगड संघास उपविजेते पदावर समाधान मानावे लागले. तर १९ वर्षे वयोगट स्पर्धेतही तिस-या फेरीत अमरावती संघाकडून रायगडचा पराभव झाल्याने तुतीय क्रमांकावर समाधान मानावे लागले. तर १९ वर्षे वयोगट स्पर्धेत योगेश काशीद, प्रणिल गिजे, कौस्तुभ गायकवाड, साहील पवार, सुजल काशीद, रोहित भोसले, हर्षल कोस्तेकर, मनिष खारगावकर, अन्वय कांबळे, प्रतिक पवार, सागर राजपूत आदी खेळाडू सहभागी झाले होते. तर १७ वर्षे वयोगट मुलांचे संघात ओम ठाकूर, करण झोलगे, राज बाकाडे, स्वराज वाळंज, श्रीयोग महाबळे, प्रतिक लोखंडे, सागर राजपूत, संयोग गायकवाड, पियुष मरवडे, हर्षल कोस्तेकर आदी खेळाडूंचा समावेश करण्यात आला होता.

१७ व १९ वर्षे वयोगट या दोन्ही संघातील सर्वच खेळाडूनी दमदार कामगिरी करून रायगड जिल्ह्याचे नाव रोशन केल्याने दोन्ही संघातील खेळाडूंचे समाजातील सर्वच क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होताना दिसत आहे.

# गणेशोत्सवात नागरिकांनी कोरोना नियमांचे पालन करावे

## शांतता कमिटी बैठकीत पोलिसांचे आवाहन



**दै.रायगड नगरी । मुकूंद रांजाणे**

**माथेरान** : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आज माथेरान मधील पोलीस ठाणे येथे शांतता कमिटीची बैठक बोलविण्यात आली होती ह्या प्रसंगी माथेरान मध्ये नव्यानेच दाखल झालेले एपीआय श्री संजय बांगर यांनी येथील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ व वैयक्तिक गणेश भक्तांसाठी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मार्गदर्शक सूचना करताना प्रशासनाला मदतीचे आवाहन केले.

पुढील काही दिवसांमध्ये कोरोनाची तिसरी लाट येण्याची शक्यता तज्ज्ञांनी वर्तवली आहे. या लाटेची गरोदर स्त्रिया व लहान मुलांना बसण्याची शक्यता वर्तविली जात आहे. या पार्श्वभूमीवर आगामी गणेशोस्तवात नागरिकांनी कोरोनाचा मुकाबला करण्यासाठी आवश्यक असलेल्या तोंडाला मास्क बांधणे, वेळोवेळी सॅनिटायझरने हात साफ करणे, सोशल डिस्टसिंग या त्रिसूत्रीचे पालन करावे, असे आवाहन माथेरानमध्ये नव्याने दाखल झालेल्या एपीआय श्री संजय बांगर यांनी ह्यावेळी केले आहे.

जिल्ह्यात कोरोना रुग्ण संख्या आटोक्यात आली आहे. मात्र तरीही दिवसभरात जिल्ह्यात १००हून अधिक कोरोना रुग्ण सापडत आहेत. पुढील काही दिवसांमध्ये कोरोनाची तिसरी लाट येण्याची शक्यता तज्ज्ञांनी वर्तवली आहे. त्यातच पुढील काही दिवसांमध्ये गणेशोस्तव सुरू होणार आहे. जिल्ह्यात घराघरात गणेशोस्तव मोठ्या भक्तिभावाने दरवर्षी साजरा करण्यात येतो. मात्र सध्याची कोरोनाची परिस्थिती पाहता उत्सवादरम्यान नागरिकांनी गर्दी करू नये, तसेच शासनाने सुचविलेल्या सूचनांचे पालन करावे, ताप, सर्दी, खोकला, अंगदुखी, चव नसणे, वास न येणे ही कोरोनाची प्रमुख लक्षणे आहेत. ही लक्षणे असणाऱ्या रुग्णांनी त्वरित अँटींजन व आर.टी.सी.पी.आर. चाचणी करणे गरजेचे आहे. ताप, सर्दी, खोकला किंवा इतर कोरोनाची लक्षणे असणारा एखादा रुग्ण एखाद्या खासगी डॉक्टरांकडे तपासणी करण्यासाठी जातात. अशावेळी खासगी डॉक्टरांनी रुग्णाला त्वरित अँटींजन व आर.टी. सी.पी.आर. चाचणी करण्याचा सल्ला देणे गरजेचे आहे. कोरोना आजाराला रोखण्यासाठी नागरिकांनी शासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे, गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळावे, मास्क वापरावा, सोशल डिस्टंसिंगचे पालन करावे, सॅनिटायजरचा वापर करावा, असे आवाहन एपीआय श्री. संजय बांगर यांनी ह्यावेळी केले ह्यावेळी पोलीस महेंद्र राठोड , पोलीस शिपाई भोई, पोलीस पाटील व माथेरांमधील अनेक नागरिक उपस्थित होते.

# सात लाख ४४ हजार रुपयांच्या फसवणूक प्रकरणी गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बुकिंग करता सात लाख ४४ हजार रुपये घेऊन रूम न दिल्या प्रकरणी पद्मावती बिल्डर्स आणि डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक विकास हिराजी म्हात्रे, विद्या प्रकाश प्रेमप्रकाश सिंग व बाळकृष्ण सिनारे यांच्याविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सेक्टर ३ नवीन पनवेल येथे राहणारे मन्सूर शब्बीर मुलानी हे महाराष्ट्र राज्य परिवहन सेवेत काम करतात. पद्मा-वती बिल्डर्स आणि डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक विकास म्हात्रे, विद्या प्रकाश सिंग व बाळकृष्ण सिनारे यांनी मन्सूर यांच्याकडून शिलोत्तर राईचुर येथील चार गुंठे मध्ये सुरू असलेल्या बालाजी मीडोस नियोजित बिल्डिंगच्या बुकिंग करता एकूण सात लाख ४४ हजार दोनशे पन्नास रुपये घेतले. या प्रोजेक्टमध्ये तिघांना फक्त व्यवस्थापक म्हणून काम दिले असताना आणि त्यांना बिलकन प्रायव्हेट लिमिटेड यांनी कोणतीही बुकिंग करण्याची परमिशन दिलेली नसताना फसवणूक करण्याकरता मन्सूर यांच्याकडून बुकिंग करता रक्कम घेण्यात आली. ती रक्कम परत मागितली असता मन्सूर मुलानी यांना रक्कम परत दिली नाही. व त्यांची फसवणूक केली. या प्रकरणी तिघांविरुद्ध खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# नवीन दागिने बनवून देतो असे सांगून केली फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जुन्या सोन्याचे दागिने घेऊन चांगल्या प्रतीचे नवीन दागिने बनवून देतो असे सांगून २९ वर्षीय महिलेची एक लाख ९४ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सेक्टर १०, नवीन पनवेल येथे राहणारे मनाली पवार या नवीन पनवेल येथील सुखकर्ता ज्वेलर्स येथे सोन्याचे दागिने बनविण्यासाठी गेल्या होत्या.

यावेळी त्या दुकानात असणारे मोरे यांनी त्यांना जुने सोने असेल तर जमा करा व नवीन सोने खरेदी करा, तुम्हाला चांगल्या प्रतीचे सोन्याचे दागिने बनवून देतो असे सांगितले. यावेळी मनाली पवार यांनी त्यांच्यावर विश्वास ठेवला व त्यांच्याजवळ असलेले जुने सोने त्यांना दिले. त्यानंतर दागिने मिळण्याबाबत त्यांना वारंवार सांगितले असता टाळाटाळ करून रक्कम दिली नाही.

त्यामुळे पवार यांनी पैसे परत मागितले यावेळी त्यांनी चेक दिला. तो चेक बाउन्स झाला. त्यानंतर मोरे यांनी दुकान बंद केले व ते कुठेतरी निघून गेले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच मनाली पवार यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात मोरे यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला.

# कोरोना काळातील नियमांचे पालन करून गणेशोत्सव शांततेत पार करण्याचे पोलिस प्रशासनाचे जनतेला आवाहन

**दै.रायगड नगरी । नंदकुमार मरवडे**

**खांब-रोहा** : गणेशोत्सव सणाच्या पार्श्वभूमीवर कोलाड विभागात कोलाड सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष जाधव यांनी गावो गावी गावं बैठका आयोजित केल्या असून, येणारा गणेशोत्सव सण हा कोरोना काळातील नियमांचे पालन करून शांततेत पार पाडावा असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

कोलाड पोलीस ठाणे हद्दीतील विविध गावातील हिंदू समाज अध्यक्ष, गाव-अध्यक्ष, सरपंच, तंटामुक्ती अध्यक्ष, शांतता कमिटी सदस्य, पोलीस पाटील यांच्या समवेत गाव बैठकांचे आयोजन करून तशाप्रकारचे अवाहन करण्यात येत आहे. तर कोलाड पोलिस स्टेशन हद्दीतील तळवली तर्फे अष्टमी येथे आयोजित करण्यात आलेल्या गाव बैठकीमध्ये पो.अधिकारी सुभाष जाधव व अन्य अधिकारी यांनी ग्रामस्थांना शांतता व सलोखा राखून तसेच कोरोना काळातील नियमांचे पालन करून उत्सव साजरा करण्याचे अवाहन केले.



यावेळी गावचे पो.पाटील खेळू मरवडे, माजी सरपंच वसंत मरवडे, माजी उपसरपंच रघुनाथ कोस्तेकर, मारूती महाराज कोलाटकर, रामचंद्र बामणे, रामचंद्र मरवडे, देवजी मरवडे, काशिराम गायकर, अनंत मरवडे, सुभाष बामणे, शंकर मरवडे आदींसह अन्य ग्रामस्थ उपस्थित होते. सध्या कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाला असला तरी तिसरी लाट येण्याची संभावना असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. कोलाड विभागात पोलीस अधिकारी सुभाष जाधव हे आपल्या अन्य पोलिस अधिकारी व कर्मचारी समवेत ठिकठिकाणी गाव बैठका घेत अजून या बैठकीत हे गणेशोत्सव शांततेत तसेच कोरोना काळातील नियमांचे पालन करून करावे असे आहवान करीत आ-हेत. यावेळी गणेशोत्सवाच्या मार्गदर्शक सूचना २०२१ ची परिपत्रकाचे वाटप करून सर्वांना उत्सव साध्या पध्दतीने पार पडण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या. तसेच या कालावधीत काढण्यात येणाऱ्या मिरवणुकांवर शासनाचे निर्बंध असल्याने मिरवणूका काढता येणार नसल्याचे सांगून गावातील काही वाद विवाद असल्यास माहिती देण्याचे आव्हान पोलिसांनी दिले आहे.

# रिक्षा संघटनेच्या कचेरी रोड येथील नामफलकाचे अनावरण



**दै.रायगड नगरी । रवींद्र कुवेसकर**

**उतेखोल/माणगाव** : रिक्षा चालक मालक संघटना माणगांव वैद्य हॉस्पिटल कचेरी रोड नविन कमिटीच्या नाम फलकाचा अनावरण सोहळा मंगळवार दि. ७ सप्टेंबर रोजी संपन्न झाला. संघटनेच्या नामफलकाचे अनावरण विभागीय कार्याध्यक्ष पराग सावंत यांच्या हस्ते श्रीफळ फोडून करण्यात आले. पराग सावंत यांच्या रूपाने रिक्षा संघटनेला एक कुशल नेतृत्व मिळाले असून संस्थापक तालुका अध्यक्ष संजय अण्णा साबळे यांचे मोलाचे मार्गदर्शन संघटनेला वेळोवेळी मिळत आहे.

यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष चंद्रकांत मढवी यांनी कार्याध्यक्ष श्री पराग सावंत यांना पुष्पगुच्छ देऊन यापूढे या स्टँडच्या उन्नती साठी अहोरात्र झटण्याची ग्वाही दिली व सर्वांचे आभार मानले. याप्रसंगी प्रकाश शेलार, मंचक कांबळे, नजीर करदेकर, भावेश गुरव, मुखत्यार माटवणकर हे सदस्य उपस्थित होते.

# अनोळखी इसमाचा मृतदेह आढळला

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गांधी हॉस्पिटल येथील सार्वजनिक मुतारी जवळ अनोळखी इसमाचा मृतदेह पनवेल शहर पोलिसांना सापडून आला आहे. पोलीस त्याच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत.

या ईसमाचे अंदाजे वय ४० ते ४५ वर्षे असून त्याच्या डोक्याचे केस सफेद व काळे वाढलेले आहेत. त्याचा चेहरा उभट असून डोळे अर्धवट उघडे आहेत. त्याने अंगात सफेद खाकी रंगाचे चेकस असलेल्या फुल बाह्यांचे शर्ट व खाकी रंगाची फुल जीन्स पॅन्ट घातलेली आहे.

या ईसमाबाबत अधिक माहिती असल्यास त्यांनी शहर पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक पी कदम यांच्याशी संपर्क साधावा.


## पनवेल महानगरपालिका

**जाहीर ई-निविदा सूचना सन २०२१-२२ करिता**

सन २०२१-२०२२ ते २०२२-२०२३ च्या निविदा मंजूर होईपर्यंतच्या कालावधी करिता पनवेल शहरातील एकूण १० राष्ट्रीय पुरुषांच्या पुतळ्यांना नियमितपणे पुष्पहार घालणे व आवश्यकतेनुसार शासकीय परिपत्रकानुसार जयंतीस, पुष्पतोरण, माळ व फुले, हॅण्डबुके, साधेबुके नमुन्या प्रमाणे पुरविणे बाबतची कामाची अंदाजित किंमत रक्कम रुपये ३,२८,६८०/- मात्र येणे अपेक्षित आहे. या कामासंबंधीच्या सविस्तर तपशिल mahatender.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**सही/-**
**(तृप्ती सांडभोर)**
**अतिरिक्त आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र.पमपा/भांडार/२९२१/प्र.क्र.०१/४२८/२०२१
दिनांक : ०७/०९/२०२१



## ग्रामपंचायत गोवठणे

## मु.गोवठणे, पो.आवरे, ता.उरण, जि.रायगड

## जाहीर निविदा सन २०२१/२०२२

प्रति,
अधिकृत/अनुभवी ठेकेदार

यांस कळविण्यात येते की, ग्रामपंचायत गोवठणे हद्दीतील १५ व्या वित्त आयोगांतर्गत खालील विकासकामे करावयाची आहेत. त्याकरिता ग्रामपंचायत हद्दीतील/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळविण्याकरिता अर्जाची तारीख दि.०९/०९/२०२१ ते १७/०९/२०२१ पर्यंत या दिवशी (सुट्टीचे दिवस वगळून) कार्यालयीन वेळेत मिळतील.

सदर निविदा दि.१७/०९/२०२१ रोजी दुपारी ११.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील आणि सदर निविदा याच दिवशी कार्यालयीन वेळेत दि.१२.३० वाजता उघडण्यात येतील. कामाकरिता लागणारी इसारा रक्कम ग्रामपंचायत गोठवणेच्या नावाने डिमांड ड्राफ्ट/रोखीने स्वीकारण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे, अगर नाकारणेचा संपूर्ण अधिकार ग्रामपंचायत गोठवणे यांनी राखून ठेवला आहे. इसारा रक्कम प्रथम/अंतिम देयकांमधून परस्पर कापून घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | कामांची नावे | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम १% | सुरक्षा अनामत ५% | निविदा किंमत | निविदा पाठविणेची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | धर्मेंद्र म्हात्रे यांचे घर ते दमयंती म्हात्रे घरापर्यंत पेव्हर ब्लॉक रस्ता तयार करणे | २,००,०००.०० | २०००.०० | १०,०००.०० | २००.०० | दि.१७/०९/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत |
| २ | नामदेव पाटील यांचे घर ते प्रवीण पाटील यांचे घरापर्यंत पेव्हर ब्लॉक रस्ता तयार करणे | २,००,०००.०० | २०००.०० | १०,०००.०० | २००.०० | |

शासनाच्या निकषांप्रमाणे अटी व शर्ती खालीलप्रमाणे :-

अटी व शर्ती :-

१) सर्वात कमी दराचे अथवा कोणतेही टेंडर मंजूर अगर नामंजूर करण्याचा आधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे, त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

२) सदर काम पंचायत समितीकडील बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करणेचे आहे. त्याचे मुल्यांकनाप्रमाणे बिल अदा करण्यात येईल.

३) काम ज्याच्या नावे मंजूर होईल त्यांनी नियमा प्रमाणे रुपये २०० स्टॅम्प पेपरवर बॉण्ड करून देणे

४) कामाचे ईस्टीमेट ऑफिस वेळेत पहावयास मिळेल.

५) दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास बिल अदा करणे अगर न करणे याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**श्री.प्रमोद मधुकर मुकुंदे**
**ग्रामपंचायत गोवठणे**
**ता.उरण, जि.रायगड**

**सही/-**
**सरपंच**
**सौ.प्रणिता प्रदीप म्हात्रे**
**ग्रामपंचायत गोवठणे**
**ता.उरण, जि.रायगड**



श्री.भाकरे सो.कोर्ट

अर्जदाराचे वकील
ॲड.संगम प्रकाश सावंत

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.११३६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१४/१०/२१

श्रीमती.सीता कुमारी झा
वय : ६५ वर्षे, धंदा : नोकरी
रा.फ्लॅट नं.०१, बिल्डींग नं.२०,
केंद्रीय विहार-४ को.ऑप.हौ.सोसा.लि.,
सेक्टर ११, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार यांचे पती कै.बिमल कुमार झा, दि.१०/०१/२०२१ रोजी बीएआरसी हॉस्पिटल, बीएआरसी कॉलनी, कुर्ला मुंबई-४०००९४, येथे मयत झाले आहेत.

कै.बिमल कुमार झा यांचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**फ्लॅट नं.०१, बिल्डींग नं.२०, केंद्रीय विहार-४**
**को.ऑप.हौ.सोसा.लि., सेक्टर ११, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड**

येणेप्रमाणे मिळकतींचे वर्णन असून सदर सदनिका मिळकतीमध्ये कै. बिमल कुमार झा यांचे नावे असून वर उल्लेखिलेली मिळकत ही फक्त कै.बिमल कुमार झा यांचे नांवे आहे. त्यात कै.बिमल कुमार झा यांचा पूर्ण हिस्सा आहे.

येणेप्रमाणे वर वर्णन केलेल्या मिळकतींच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी या मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार कै.बिमल कुमार झा यांचे कायदेशीर वारसदार आहेत असे अर्जदारांचे म्हणणे आहे. अर्जदारांचे हक्काबद्दल कोणासही हरकत घ्यावयाची असल्यास अथवा वारसदाखला देण्यास कोणतीही हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १ महिन्याचे आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकत घेण्याची आहे. जर या कालावधीमध्ये कोणीही योग्य हरकती घेतल्या नाहीत तर मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि अर्जदार जर कै.बिमल कुमार झा यांचे वारसपत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.८/९/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व मे.न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल



मे.मुजावर साहेब

ॲड.सरिता रामधरणे-शहासने

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.११६५/२०२१
नि.नं.८
ने.ता.१२/१०/२१

१) श्री.कमलाकर हौशिराम पाटील
उ.व.५९ वर्षे, धंदा : रिटायर्ड
२) कु.स्वराली कमलाकर पाटील
उ.व.२४ वर्षे, धंदा : शिक्षण
३) कु.कुंदन कमलाकर पाटील
वय : १९ वर्षे, धंदा : शिक्षण
१ ते ३ रा.सी-५, बिल्डींग-०६,
रुम नं.०३, सेक्टर-१८, अभ्युदय बँकेजवळ,
नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
४) सौ.रसिका सतीश ठाकूर
वय : ३० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.नारायण निवास, फ्लॅट नं.१०१, दातार आळी,
दातार वाडा, पेण, ता.पेण, जि.रायगड — अर्जदार

अर्जदार क्र.१ यांची पत्नी व अर्जदार क्र.२ ते ४ यांची आई कै. कुंदा कमलाकर पाटील ह्या दि.१९/०३/२००३ रोजी कामोठे, ता.पनवेल येथे मयत झालेले आहेत. सदरहू मयत कै.कुंदा कमलाकर पाटील यांचे मृत्यूसमयी त्यांचे नावे व अर्जदार क्र.१ यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | मिळकतीचे वर्णन | क्षेत्र |
|---|---|---|
| १ | सी ५/६/०:३, सेक्टर १८, तळमजला, नवीन पनवेल | ४३.२८ चौ.मी. (बिल्टअप) |
| २ | शॉप नं.१७, ओमकार आर्केड, तळमजला, प्लॉट नं.२४, सेक्टर-१५ अे, नवीन पनवेल (पूर्व) | २४४ चौ.फूट कारपेट आणि सुपर कव्हर्ड क्षेत्र ३८७ चौ.फूट |

वरील मिळकतीबाबत अर्जदार ह्यांनी वारसाचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशा कोणत्याही प्रकारची तक्रार, वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत मुदतीत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

ही नोटीस आज दि.८ माहे सप्टेंबर सन २०२१ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## बाजारात दाखल झालेल्या आकर्षक गणेशमूर्तींचे साऱ्यांनाच आकर्षण

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

महाराष्ट्र राज्यासह संपूर्ण देशातील हिंदू धर्मियांचा सर्वाधिक लोकप्रिय व जिव्हाळ्याचा विषय असलेला गणेशोत्सव अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपला आहे.त्या पार्श्वभूमीवर श्री गणेशाच्या मूर्तीही बाजारात ठिकठिकाणी विक्रीसाठी आलेल्या असतानाच्या दिसून येत असून सा–यांनाच या मुर्तींचे आकर्षण वाटत आहे.

गणेशोत्सवानिमित्त व याही कोरोनाचा प्रादूर्भावही कमी झाला असल्याचे दिसून येत असल्याने सर्वत्र उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. बाजारात देखील गणे–शोत्सवात लागणा–या विविध प्रकारचे साहित्य खरेदी करण्यासाठी गणेशभक्तांची लगबग दिसून येत आहे. तर ठिकठिकाणी विक्रीसाठी आलेल्या गणेशमूर्तीबद्दल देखील कमालीचे आकर्षण वाटत आहे.प्लास्टर ऑंफ पॅरिसच्या मूर्तीमुळे पर्यावरणाची होणारी हानी व त्या मूर्ती या लवकर विरघळत नसल्याने गणेशभक्त देखील शाडूच्या मूर्तीना आपली पसंती दर्शवित आहेत.अवघ्या दोन दिवसांवर गणेशोत्सवाचा सोहळा येऊन ठेपला असल्याने स्थानिक मूर्तीकार व कारागीर देखील रात्रीचा दिवस करून आपले उरले सुरलेले काम पुर्ण करण्याच्या मार्गावर असल्याचे एकंदरीतच परिस्थितीवरून दिसत आहे.

## घोषवाक्य लेखन स्पर्धेत सर्व ग्रामपंचायतीनी सहभाग घ्यावा : डॉ. किरण पाटील

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा–२ अंतर्गत हागणदारीमुक्त अधिक कार्यक्रम अधिक सक्रिय करण्यासाठी हागणदारीमुक्त अधिक या विषयावर घोषवाक्य लेखन स्पर्धा दि. ०१ सप्टेंबर २०२१ ते दि. १५ ऑक्टोबर २०२१ या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहेत. ही घोषवाक्य लेखन स्पर्धा चा उद्देश हागणदारीमुक्त कार्यक्रमाबाबत लोकांमध्ये जागृती निर्माण करून लोकसहभाग वाढविणे हा आहे. या स्पर्धेमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींना राज्य व जिल्हा पातळीवर गौरविण्यात येणार आहे. सहभागी ग्रामपंचायतनी शौचालयाचा नियमित वापर, लहान मुलाच्या विष्टेचे व्यवस्थापन, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, गोबरधन, ओला, सुका व प्लॅस्टिक कचरा विलगीकरण इत्यादी विषयावर जास्तीत जास्त रंगीत घोषवाक्ये भिंतीवर लिहिण्याची आहेत.

### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

## व्हीआयपी सिम कार्ड देण्याच्या बहाण्याने केली फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्वस्तात जिओ कंपनीचे व्हीआयपी सिम कार्ड नंबर देतो असे आमिष दाखवून एक लाख सत्तर हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. खांदेश्वर पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सेक्टर ९ वाशी येथे राहणारे प्रकाश कृष्ण ओंबळे यांचा किरण टेलिकॉम या नावाने आयडिया गॅलरी चालविण्याचा व्यवसाय नवीन पनवेल येथे आहे. त्यांनी देवराज यादव याना संपर्क करून व्हीआयपी सिमकार्ड हवे असल्याचे सांगितले. यावेळी त्याच्याकडे स्वस्त किमतीमध्ये कोणत्याही मोबाईल कंपनीचे व्हीआयपी नंबरचे सिमकार्ड १ लाख ७० हजार रुपयांमध्ये मिळू शकते असे सांगितले.

यावेळी त्याच्यावर विश्वास ठेवून प्रकाश यांनी देवराज यादव याना सिमकार्ड पोटी १ लाख ७० हजार रुपये दिले. त्यानंतर त्यांनी बऱ्याच वेळा सिमकार्डची मागणी केली. याबाबत फोन केला असता कंपनीसोबत बोलणे सुरू असून उद्या सिम कार्ड आणून देतो असे सांगण्यात आले. काही दिवसांनी प्रकाश यांनी पैसे परत मागण्यास सुरुवात केली. मात्र पैसे परत मिळाले नाहीत. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच प्रकाश कृष्णा ओंबळे यांनी देवराज यादव याच्या विरोधात गुन्हा दाखल केला.

## कलावंत मानधन देण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मागील दोन वर्षांपासून कोविड १९ या महामारीमुळे भजन, कीर्तन, प्रवचन या माध्यमातून होणाऱ्या समाजप्रबोधनाचे साप्ताहिक कार्यक्रम बंद आहेत. त्यामुळे कलावंतांवर उपासमारीची वेळ आली आहे. मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेल्या योजनेअंतर्गत सांप्रदायिक, कीर्तनकार व सहकारी मंडळी यांना मदत मिळणे जरुरीचे आहे. मात्र कीर्तनकार व सहकारी मंडळी त्यांच्या नावाची प्रसिद्धी नसल्यामुळे वारकरी साहित्य परिषद, महाराष्ट्र या संघटनेचे स्थानिक पदाधिकारी म्हणून पनवेल तहसीलदार विजय तळेकर यांना कलावंतांना मानधन मिळणेबाबत निवेदन देण्यात आले आहे. वारकरी साहित्य परिषद, पनवेल तालुका, रायगड यांच्यातर्फे कलावंतांना मानधन मिळण्याची मागणी करण्यात आली आहे. पनवेल तालुक्यातील कीर्तनकार, टाळकरी, विणेकरी, गायक, वादक इत्यादी कलावंत मंडळींच्या नावांची यादी निवेदनासोबत जोडण्यात आली आहे.

# एलॲण्डटी ठेकेदार कंपनीच्या अकल्पनीय कामामुळे पोलादपूरला महामार्ग ढासळतोय!

## सर्व्हिस रोडच्या लालमातीचे ढिगारे मंगळवारी रात्री अंडरपासच्या खंदकात

**दै.रायगड नगरी । शैलेश पालकर**

**पोलादपूर :** मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ वर कोणत्याही नियोजनाअभावी एलॲण्डटी ठेकेदार कंपनी केलेल्या अकल्पनीय कामामुळे अंडरपासच्या खंदकात सर्व्हिसरोडच्या लालमातीचे ढिगारे मंगळवारी रात्री खंदकात कोसळू लागल्याचे दृश्य पाहण्यास मिळाले. सोमवारपासून कोकणात गणेशोत्सवासाठी जाणाऱ्या गणेशभक्तांच्या वाहनांच्या रांगा महामार्गावर ट्राफिक जॅममुळे खोळंबा होऊन थांबल्याचे दृश्य दिसू लागले असताना मंगळवारी रात्री पोलादपूर शहरातील महामार्ग ढासळू लागल्याने ऐन गणे–शोत्सव काळात या खंदकालगतचे सर्व्हिसरोड कमकुवत होऊन महामार्ग गायब होण्याची चिन्हे दिसून येत आहेत. माजी आमदार स्व.माणिक जगताप यांनी या अंडरपास रस्त्याला कडाडून विरोध केला होता.



मंगळवारी रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास पोलादपूर शहरातील अंडरपास बॉक्स कटिंगच्या खंदकात पश्चिमेचाही सर्व्हिस रोड ढासळला आहे. पुर्वेकडील सर्व्हिस रोड वरून सध्या मुंबई आणि गोव्याकडे अशी दुहेरी वाहतूक केली जात आहे. नुकत्याच झालेल्या मानवी साखळी आंदोलनावेळी मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील वीर ते पोलादपूर कशेडी घाटातील चौपदरीकरणासाठीची ठेकेदार एलअँडटी कंपनीकडून सुमार दर्जाचे काम करण्यात आल्याकडे सर्वच आंदोलनकर्त्यांनी अर्थपूर्ण दुर्लक्ष केले होते. गणेशोत्सवापूर्वी पोलादपूर येथील महामार्गावरील वाहतूक केवळ १३० मीटर रुंदीच्या पुर्वेकडील सर्व्हिस रोडवरून होत असल्याने वाहतुकीची कोंडी होत आहे. याखेरीज, या अवजड वाहनांमुळे सर्व्हिस रोडच्या लाल मातीचे ढिगारे खंदकात कोसळू लागले आ–हेत. पोलादपूर शहरातील चौपदरीकरणाचे काम खंदकातून सुरू आहे. मात्र, खंदकात संरक्षक भिंती न बांधल्याने लाल मातीचे ढिगारे कोसळू लागले आहेत ज्या बाजूस पुर्वेकडील सर्व्हिस रोड आहे आणि फक्त या एकाच सर्व्हिस रोडवरूनच सध्या मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील वाह–तूक सुरू आहे. पोलादपूर शहरात भुसंपादित जमिनींचा संपूर्ण ताबा घेऊन चौपदरीकरणाचे काम सुरू न केल्यास ऐन गणेशोत्सव काळात अंडरपास साठी केलेल्या बॉक्स कटिंग खंदकात वारंवार लाल मातीचे ढिगारे कोसळून सर्व्हिस रोड कमकुवत होणार आहे.

पोलादपूर शहरातील चौपदरीकरणातील मंजूर आराखड्यात केवळ एकच व्हेइक्युलर ब्रिज नमूद असताना आणखी चार ब्रिज उभारण्यात आले आहेत. महामार्गासाठी खणलेल्या खंदकात लाल मातीचे ढिगारे कोसळू नये, यासाठी काँक्रीटच्या फोमचे तीन लेयर देण्यात येणार असून यापैकी दोन लेयर दिल्यानंतर हा सर्व्हिस रोड अंडरपास बॉक्स कटिंगच्या खंदकात मंगळवारी रात्री कोसळला आहे. एकीकडे, विद्यामंदिर पोलादपूर येथील भूसंपादित जमिनीवर चक्क काँक्रीटची संरक्षण भिंत घालण्यात आली असताना दुसरीकडे चौपदरीकरणातील अंडरपास बॉक्सकटींग रस्त्यावर वारंवार ढासळणाऱ्या लालमातीच्या ढिगाऱ्यांसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून केवळ काँक्रीटचे फोमिंग आणि लोखंडी जाळी लावण्याचा प्रकार एलअँडटी ठेकेदार कंपनीने चालविला आहे. यामुळे नजिकच्या काळात फोमिंगसह संपूर्ण पूर्वेकडील सर्व्हिसरोड या अंडरपास बॉक्सकटींगच्या खंदकामध्ये वारंवार कोसळण्याच्या घटनांत वाढ होणार आहे. याखेरिज, सर्व्हिसरोडवरील वाहनेदेखील खंदकांमध्ये कोसळण्याची शक्यता या तकलादू काँक्रीट फोमिंगच्या तंत्रामुळे निर्माण झाली आहे. यामुळे मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ वरील चौपदरीकरणाच्या कामाचे बिल अदा करण्यापूर्वी ब्लूम कंपनीज एलएलसी युएसए महाड ही गुणनियंत्रण कंपनी कशाप्रकारे झालेल्या कामाचा आढावा घेत असेल, याबाबत साशंकता निर्माण झाली आहे.

महाड येथील राष्ट्रीय महामार्ग बांधकाम उपविभागामार्फत पेण येथील राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागाला बिल सादर होऊन सदरचे बिल मुख्य अभियंता तथा प्रादेशिक अधिकारी रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय नवी मुंबई यांच्याकडून बिलापोटी रक्कम अदा होण्यासाठी सादर केले जात असते. यामुळे महाड पोलादपूर विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार माणिक जगताप यांनी थेट नवी मुंबई येथे मुख्यअभियंता तसेच मंत्रालयामध्ये बांधकाम विभागाचे प्रधान सचिव मनोज सौनिक यांची भेट घेऊन तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे शिष्टमंडळासोबत जाऊन या अंडरपास रस्त्याला कडाडून विरोध केला होता. यामुळे सद्यस्थितीत होणारे विरोध आणि आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर स्व.माणिक जगताप समर्थक कोणती भुमिका घेऊन पोलादपूरकरांना या अंडरपासच्या खंदकात कोसळणाऱ्या रस्त्यापासून वाचविणार अथवा कसे, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

## कोकणात जाणाऱ्या श्री गणेश भक्तांसाठी महामार्गावर रुग्णवाहिका व वैद्यकीय पथके सज्ज ठेवा : शिरिष घरत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

प्रतीवर्षाप्रमाणे या वर्षी ही दिनांक ८ सप्टेंबर ते २१ सप्टेंबर या कालावधीत सार्वजनिक श्री गणेश उत्सवाकरिता मोठ्या प्रमाणावर भाविक, भक्त–चाकरमानी मुंबई, सायन, पनवेल, गोवा महामार्गावरुण कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, जिल्हात जाणार आहेत.



ठाणे जिल्हयातील मूंब्रा–शिळफाटा व कल्याणकडून येणारी वाहनांची संख्याही मोठी असते, नवी मुंबई वाहतूक विभागाकडुन या करिता, यथायोग्य नियोजन केले जाते, परंतु ह्या वर्षी श्री गणेश उत्सव काळात कोकणात जाणार्या रेल्वे गाड्यांचे बुकिंग फूल झाल्याने मुंबई–गोवा महार्गाने कोकणात जाणार्या वाहनांची संख्या ही दरवर्षी पेक्षा जास्त असू शकते. नवी मुंबई पोलिसांच्या हद्दीत टोलनाका ते पळस्पा फाटा, नेरूळ, फ्लाय ओव्हर, तुर्भे फ्लाय ओव्हर सी.बी.डी. सर्कल, खारघर प्लाय ओव्हर, कोपरा गाव, खारघर, टोल नाका, कामोठे–कळंबोली सर्कल या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होते. शिळफाटा मुंब्रा मार्गे येणार्या व एम.आय.डी.सी. तून येणार्या अवजड वाहनांमुळे ही गणेशोस्तव काळात वाहतूक कोंडी होते. गणेशोस्तव काळात मुंबई गोवा महामार्गावरही नवी मुंबई पेण–वडखळ, माणगांव, महाड, गोरेगांव, मुरुड,जंजिरा, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात नेहमी वाहतूक करणार्या वाहनांपेक्षा अतिरिक्त लाखो वाहने व गणेशभक्त प्रवास करत असतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर मुंबई गोवा महामार्गावर संभाव्य अपघाताची संख्या वाढू शकते, अश्या वेळी आपल्या रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या महामार्गावरील प्रत्येक जिल्हयातिल सार्वजनिक आरोग्य विभागाची यंत्रणा, वैद्यकीय पथके, रुग्णवाहिका व वैद्यकीय मदत प्रत्येक वीस किलोमीटर वर उपलब्ध करून देण्यात यावे. अशी मागणी आज शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी आरोग्य मंत्री महाराष्ट्र राज्य, विभागीय आयुक्त कोकण विभाग, जिल्हाशल्यचिकित्सक अलिबाग रायगड व सार्वजनिक आरोग्य विभाग ठाणे यांचे कडे निवेदनाद्वारे केली आहे.

## नेरळ-माथेरान टॅक्सी चालकाचा प्रामाणिकपणा

**दै.रायगड नगरी । माथेरान**

कुठल्याही व्यवसायात, धंद्यात केलेली इमानदारी, विश्वासहर्ता नक्कीच भविष्यात सार्थकी ठरते आणि आपले वर्तमानातील जीवन सुध्दा आपसूकच सुख समाधानी आणि शांतताप्रिय मार्गक्रमण होत असते. आज केलेली उदार अंतःकरणाने मदत असो किंवा विश्वासाला पात्र ठरत केलेली परोपकारी भावना असो याची फलश्रुती नकळत केव्हा प्राप्त होईल हे सांगणे सुध्दा एकप्रकारे चमत्कारी असते.



माथेरान या पर्यटनस्थळावर विविध राज्यातील पर्यटक नियमितपणे भेटी देत असतात.त्यातच केवळ पर्यटनाच्या आधारावर अवलंबून असणाऱ्या स्थानीक माथेरानकरांची व्यावसायिक इमानदारी ही सर्वश्रुत आ–हेच. स्थानिक व्यक्तीला यदाकदाचित एखाद्या पर्यटकांची अनमोल, किमती वस्तू सापडली तर शक्यतो ती त्या पर्यटकांना मिळण्याची पुरेपूर खात्री असते. त्यामुळेच माथेरानचे मुख्य प्रवेशद्वार असलेल्या दस्तुरी नाक्यावर उतरल्यावर पर्यटक बिनधास्तपणे आपले सामान हमाल अथवा हातरीक्षा, घोडेवाले यांच्या भरवशावर देऊन रमतगमत आपल्या हॉटेलमध्ये जात असतात. अशीच एक प्रचिती येथे नेरळ–माथेरान दरम्यान टॅक्सी व्यवसाय करणाऱ्या इमानदारीने वागणाऱ्या व्यक्ती बाबतीत आली आहे दि.६ सप्टेंबर रोजी इथे आपल्या कुटुंबासोबत फिरावयास आलेले गुजरात अहमदाबाद येथील रितेश ध्रुव यांचा मोबाईल जवळपास ऐशी हजार रुपये किमतीचा मोबाईल ते इथून माघारी जाताना नेरळ–माथेरान–नेरळ टॅक्सीमध्ये विसरले होते. नेरळ येथे उतरल्यावर रितेश ध्रुव आपल्या कुटुंबासह आपल्या स्वतःच्या गाडीने अहमदाबाद कडे रवाना झाले. त्याचवेळी टॅक्सी चालक अन्वर पालटे नेरळ (ममदापुर) यांना गाडीत मोबाईल असल्याची जाणीव झाली. सुरुवातीला हा कुणाचा एवढा किंमती मोबाईल असावा याचा अंदाज आला नाही परंतु आताच ज्या पर्यटकांना आपण सोडले आहे त्यांचाच हा मोबाईल असावा असा अंदाज बांधून अन्वर पालटे यांनी रितेश ध्रुव यांच्या गाडीचा कर्जत पर्यंत पाठलाग केला परंतु ते सापडले नाहीत.शेवटी त्या लॉक असलेल्या मोबाईलचे लॉक जाणकारांकडून काढून घेत रितेश ध्रुव यांच्याशी संपर्क साधला असता तो त्यांचाच मोबाईल असल्याचे त्यांनी सांगितले. ताबडतोब अन्वर पालटे यांनी दिलेल्या पत्त्यावर स्वखर्चाने कुरियर करून तो मोबाईल अहमदाबादकडे पाठवला आहे. अन्वर पालटे यांनी मनात कुठल्याही प्रकारचा लोभ न ठेवता त्या पर्यटकांना किमती मोबाईल सुपूर्द केल्यामुळे सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे टॅक्सी संघटनेच्या सर्व पदाधिका–यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले आहे.

